**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार**

**अपिल क्रमांक : तक्रार क्र -९३/२०२२**

**तक्रारकर्ता,** श्री.महेंद्र नारायण पाटील
श्री वरदविनायक बिल्डींग, से.२९,
भु.क्र.बी९१ ते ९३, खोली क्र.३०१, आग्राळीगाव
ता.जि.ठाणे, नवी मुंबई ४०० ६१४

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा
उप अभियंता (स्थापत्य), बेलापूर विभाग
नवी मुंबई महानगरपालिका, भुखंड क्र.१,
किल्ले गावठानजवळ, पामबीच जंक्शन,
सेक्टर १५-ए, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा
उप अभियंता (स्थापत्य), बेलापूर विभाग
नवी मुंबई महानगरपालिका, भुखंड क्र.१,
किल्ले गावठानजवळ, पामबीच जंक्शन,
सेक्टर १५-ए, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १५.१०.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १३.९.२०२१ | ---- | २८.१०.२०२१ | ११.११.२०२१ |

तक्रारकर्ता यांनी दि.१३.१.२०२२ रोजीच्या अर्जान्वये "योग्य व संपूर्ण माहिती प्राप्तीसाठी." असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

सदर तक्रार अर्जावर आज दिनांक १५.१०.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तथापि, जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

" *(से.२९ आग्रोळी गावातील स्थानिक नगरसेविकेने गावाकरीता दर्शविलेल्या कार्यकाळातील गरज असताना वा नसताना मंजूर करवून घेतलेल्या सर्व कामांची पूर्ण ईतंभु माहिती व वेळेत वा वेळेअभावी उशीरा झाली असल्यास कंत्राटदारावर आपणाकडून झालेल्या कारवाईच्या सविस्तर माहिती सर्व छायांकित व साक्षांकित प्रती तात्काळ मिळाव्यात.)* "

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती प्राप्त झालेली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.११.११.२०२१ रोजी सुनावणी घेऊन, "*अपिलकार यांना अपेक्षित असलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (६) अन्वये अभिलेखा स्वरूपातील माहिती साक्षांकित करून १५ दिवसांत निशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.*" असे आदेश पारित करून अपिल निकाली काढले आहे.

जन माहिती अधिकारी अनुपस्थित असल्यामुळे तक्रार अर्जावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

या प्रकरणी तक्रारकर्ता यांनी असे निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही.

आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलिय अधिकारी हे त्यांना सुनावणीची नोटीस प्राप्त होऊनसुध्दा ते सुनावणीस अनुपस्थित आहेत. त्यामुळे त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. सबब, माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाबद्दल तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे पुढील सुनावणीस आयोगाकडे स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. त्याचप्रमाणे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती पुढील १५ दिवसांत विनामूल्य पुरविणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (स्थापत्य), बेलापूर विभाग, नवी मुंबई महानगरपालिका यांनी **तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती पुढील १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.संजय पाटील, उप अभियंता (स्थापत्य), बेलापूर विभाग, नवी मुंबई महानगरपालिका यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक१३.९.२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत तसेच प्रथम अपिल आदेशानंतरही माहिती पुरविली नाही. म्हणून **त्यांचेविरूध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे स्वत: उपस्थित राहून दि.१२.१२.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता सादर करावा.** अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहित धरून शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

**३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१२.१२.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १५ ऑक्टोबर, २०२४

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. संजय पाटील, उप अभियंता (स्थापत्य),
बेलापूर विभाग, नवी मुंबई महानगरपालिका, भुखंड क्र.१,
किल्ले गावठानजवळ, पामबीच जंक्शन,
सेक्टर १५-ए, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई.

- **यांना प्रत** विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (स्थापत्य),
बेलापूर विभाग, नवी मुंबई महानगरपालिका, भुखंड क्र.१,
किल्ले गावठानजवळ, पामबीच जंक्शन,
सेक्टर १५-ए, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई **यांचेमार्फत रवाना.**

राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ